


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७९५ वा | शुक्रवार दि. ०७ जून २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये




# जिल्हा रुग्णालयातील अवैध बांधकामात रचल्या जाताहेत भानगडींच्या विटांवर विटा

## जिल्हा शल्यचिकित्सकांनाही नाही माहिती,खेळखंडोबाचा कळस...


**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात होत असलेल्या अवैध व बेकायदेशीर बांधकामात भानगडींच्या विटांवर विटा रचल्या जात आहेत. जिल्हा रुग्णालयातील अधिकाऱ्यांना अंधारात ठेवून सुरू असलेल्या या बांधकामास नेमके जबाबदार तरी कोण आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. एखाद्या शासकीय कार्यालयात अवाढव्य बांधकाम करणयात येते आणि त्याच विभागाच्या अधिकाऱ्यांना त्याची पुसटशी कल्पनादेखील नसते, हे अत्यंत गंभीर उदाहरण आहे. यासंदर्भात विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, अनेक धक्कादायक बाबी समोर येत आहेत.येथील जिल्हा रुग्णालय आधीच तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सके यांच्या कार्यकाळात भोंगळ कारभार, अनागोंदी, अव्यवस्था यासह करोडो रुपयांच्या भ्रष्टाचाराच्या विळख्यात सापडलेले आहे. जिल्हा रुग्णालयात प्रशासन नावाची कोणतीही वस्तू उरलेली नाही. **कुणीही कुणाचे ऐकत नाही, कुणाचेही कुणावर नियंत्रण नाही, ही स्थिती असतांना आज कर्तव्यातअसलेले जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर सुभाष चव्हाण यांनी कर्मचाऱ्यांपासून अधिकारी पर्यंत शिस्त लावण्याची प्रामाणिक व प्रांजळ प्रयत्न करीत आहे** मागील काळात तत्कालीन जिल्हाशल्य चिकित्सक यांच्या कार्यकाळात जो काही करोडो रुपयांचा भ्रष्टाचार साहित्य ,उपकरणे खरेदीत झालेला आहे .त्या स्थितीतवर सातत्याने बोट ठेवण्याचे काम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज करीत आहे. भ्रष्टाचाराबाबत बोलायचे झाल्यास

### पोस्टमार्टम १८

**जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात नियमबाह्य सुरू असलेल्या बांधकामाचा छडा आम्ही लावू**

जिल्हा रुग्णालयात ठायीठायी भ्रष्टाचार स्वैरपणे वावरतो आहे. जिल्हा रुग्णालयातील जास्तीत जास्त अधिकारी हे सदैव भ्रष्टाचाराच्या गटारात लोळताना दिसत आहेत. या संपूर्ण स्थितीत जिल्हा रुग्णालयात सुरू असलेल्या अवैध व बेकायदेशीर बांधकामाने जिल्हा रुग्णालयातील व्यवस्था अक्षरशः उघडी-नागडी केली आहे.जिल्हा रुग्णालयात सुरू असलेल्या बांधकामाबाबत सुरवातीला सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने जिल्हा रुग्णालयाच्या प्रशासनाला माहिती विचारण्यात आली. धक्कादायक बाब ही समोर आली की, या बांधकामाविषयी कोणतीही माहिती जिल्हा रुग्णालय प्रशासनाला नव्हती. नियमानुसार याविषयीची माहिती जिल्हा रुग्णालयास देणे बंधनकारक होते. परंतु एकीकडे नॅशनल हेल्थ मिशन विभागाचे अधिकारी आणि दुसरीकडे हे बांधकाम करणारा जिल्ह्या पलीकडं असलेला कंत्राटदार सर्वच मुजोर आणि मस्तवाल झालेले असल्या कारणाने मग या बांधकामाविषयी कोणीही माहिती देण्यास तयार नाही. कंत्राटदाराला अधिकाऱ्यांकडून आणि अधिकाऱ्यांना राजकीय नेत्यांकडून प्रचंड संरक्षण प्राप्त होत असल्याने




सर्वच काही मनमानी पद्धतीने होताना दिसत आहे. विशेष म्हणजे जे बांधकाम सुरू आहे, त्याचा दर्जा तपासल्यास लक्षात येईल की या बांधकामाचा दर्जा अतिशय सुमार आहे. खरे तर ही इमारत पूर्ण झाल्यानंतर या ठिकाणी जे काही कामकाज चालेल, त्या दरम्यान इमारतीला काही धोका उत्पन्न झाल्यास आणि त्यात जर जीवित हानी किंवा मानवी हानी झाली, तर त्याला जबाबदार कोण असणार याचे उत्तर आज तर मिळताना दिसून येत नाही. जिल्हा रूग्णालयाप्रमाणे या नॅशनल हेल्थ मिशन विभाग, आरोग्य विभाग सर्वच जण या बांधकामाबाबत माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत. कंत्राटदार व जावर.. सह पडघा.. संबंधित शासकीय अधिकारी त्याच्याकडूनही माहिती मिळण्याची सूतराम शक्यता दिसत नाही. आरोग्य विभाग आजारी, नॅशनल हेल्थ मिशन विभाग आंधळा अशा स्थितीत सर्वसामान्य माहिती मिळेल तरी कुठून? नॅशनल हेल्थ मिशन विभाग हा तसाही भ्रष्टाचारासाठी चांगलाच चीरपरिचित आहे. त्यातच जिल्हा रुग्णालयासारखा भ्रष्ट आणि अव्यवस्था माजलेला विभाग त्याला येऊन मिळाल्यानंतर मग भ्रष्टाचार किंवा अव्यवस्था हे ठरलेलेच. त्यामुळेच की काय या विषयाची माहिती कोणाला होताना दिसून येत नाही. जिल्हा रुग्णालय असो की नॅशनल हेल्थ मिशन विभाग या सर्वांच्या भ्रष्टाचारासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने लिहित आलेला आहे व जनतेचा एक जागता प्रहरी या नात्याने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज लढत आलेला आहे. अशाप्रकारचे बेकायदेशीर काम किंवा भ्रष्टाचार सातत्याने उघड करण्याचे काम आपले पत्रकारितेचे आद्य कर्तव्य म्हणून उघड करण्याचे काम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज भविष्यात देखील करीत राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# पत्नीला रस्त्यात अडवून मागितला घटस्फोट !

**जनसंचलन/ खामगाव**

रस्त्यात अडवून एका विवाहितेला घटस्फोटासाठी धमकी दिली. ही घटना अंजुमन हायस्कूलजवळ घडली. याप्रकरणी विवाहितेच्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी पतीसह तिघांविरोधात गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार, स्थानिक मिल्लत कॉलनीतील विवाहितेचा ८ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता अंजुमन हायस्कूलजवळील रस्त्यावरून जात असताना तिला आरोपीने रस्त्यात भदतन शितीगाल केली दिलेली गुन्हा असोथ लॅब बस तक्रार मागे घेण्यासाठी जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप ५ जून रोजी दिलेल्या तक्रारीत करण्यात आला आहे. या तक्रारीवरून शहर पोलिसांनी उपरोक्त तिघांविरोधात भादंवि कलम ३४१, २९४, ५०६, ३४ अन्वये




गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोटेकॉ गजानन पाटील करीत आहे.

# वीजपुरवठा खंडित शेतकरी हैराण

**जनसंचलन/ खामगाव**

वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने मान्सूनपूर्व कपाशीची लागवड केलेले शेतकरी अडचणीत सापडले आहेत. तालुक्यातील शेतकऱ्यांनी मान्सूनपूर्व कपाशी लागवडीला सुरुवात केली आहे. यावर्षी कापसाला कमी भाव मिळाला असला तरी सिंचनाची व्यवस्था असलेले शेतकरी कपाशी पिकाला पसंती देत आहेत. मात्र, या पिकाला पाणी देण्यासाठी सलग वीजपुरवठा मिळत नसल्याचे



दिसून येत आहे. वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने सिंचन कसे करावे? हा प्रश्न आहे. रात्री भारनियमन करावे व दिवसभर वीजपुरवठा सुरू ठेवावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तब्बल तीस वर्षानंतर झाली वर्ग मित्रांची भेट जुन्या आठवणींना मिळाला उजाळा

**जनसंचलन/ लोणार**

समाज माध्यमांच्या सदुपयोगाचा एक परिपाक म्हणजे जुन्या वर्गमित्र मैत्रिणीचा होणारा स्नेह भेट सोहळा, अशा समाज माध्यमांमुळे एकत्रित आलेल्या लोणार येथील शाळेमध्ये शिकलेल्या सर्व वर्गमित्र मैत्रिणींना एकत्रित येण्याचा योग आला, लोणार शहरातील पटेल हायस्कूल महाराणा प्रताप हायस्कूल व श्री शिवाजी हायस्कूल या तीनही महाविद्यालयांमध्ये सन १९९४ ते १९९६ मध्ये दहावी व बारावी झालेल्या सर्व वर्गमित्र मैत्रिणींचा मेळावा लोणार येथे आयोजित करण्यात आला होता, याच वर्गमित्रांचे तत्कालीन वर्गमित्र असलेले अलोकमुनी श्री यांचा नुकताच लोणार दौरा पार पडलेला आहे आपल्या याच जुन्या वर्ग मित्राला भेटण्यासाठी राज्याचे आणि देशभराच्या कानाकोपऱ्यातून आलेले अलोक मुनी यांचे सर्व वर्गमित्र काल लोणार मध्ये एकत्रित आले होते ३० तारखेला मुनी श्रींच्या दर्शनानंतर ३१ तारखेला तत्कालीन कार्यरत असलेले शिक्षक प्राध्यापक कुळसुंदर सर रेदासनी सर, जी एस मापारी सर कांताराव अंभोरे सर सुपत्यान सर,अंबादास मापारी सर या सर्वांच्या उपस्थितीत असणे भेट मेळावा रंगला, तब्बल तीस वर्षानंतर एकत्र झालेल्या मित्र-मैत्रिणींच्या जुन्या आठवणींना या निमित्ताने उजाळा देण्यात आला मागच्या तीस वर्षात ज्या मित्र-मैत्रिणींनी या जगाचा निरोप घेतला त्यांना श्रद्धांजली सुद्धा वाहण्यात आली एकंदरीतच अतिशय वेगळ्या आठवणींच्या या मेळाव्यामध्ये सर्वजण आपल्या बालपणीच्या आठवणींमध्ये रमलेली दिसले सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हाट्सअप ग्रुप या सर्व वर्ग मित्रांनी बनवला होता आणि त्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात आल्यामुळे यांची भेट होऊ शकली या कार्यक्रमाचे आयोजन मेकर रोडवरील शिवशंभू मंगल कार्यालय येथे करण्यात आले होते कार्यक्रमाचे आयोजनासाठी पुढाकार घेतलेल्यांमध्ये डॉक्टर भास्कर मापारी, जम्मू सिंगी, प्रमोद राका,शितल रेदासनी लातूरच्या उद्योजिका वंदना कोटेच्या, चार्टर्ड अकाउंटंट सचिन संचेती, डी एफ ओ सचिन शिंदे, कैलास बचाटे,विलास जाधव पवन कोठारी



यांनी आपल्या सर्व वर्गमित्र मैत्रिणींना एकत्रित करीत हा सोहळा या ठिकाणी आयोजित केला होता या निमित्ताने उपस्थित शिक्षकांचा हृदय सत्कार सुद्धा करण्यात आला, जीवनाच्या आपलं जीवन तणाव मुक्त कसे व्यतीत करायचं याविषयीचे मोलाचं मार्गदर्शन या त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना केलं या सोहळ्यासाठी एसटीआय दिलीप जाधव संभाजीनगरच्या महापालिका सदस्य राखी खटोड, वंदना वरकड,अर्चना चोपडे, रेवती मोरे वंदना कुळसुंदर, डॉक्टर पंकज जोशी, डॉक्टर प्रवीण बनमेरू, सोनल संचेती,कीर्ती तोष्णीवाल,सोनाली खटोड,उमेश कुटे, अजित खिवसारा ,त्रिपुरा इथून आलेले सुनील लाटे, सचिन बेदमुथा,राजेश शर्मा यांच्यासह ६५ वर्गमित्र मैत्रिणी या स्नेह भेट सोहळ्यात एकत्र आले होते.

# राखून ठेवलेले बियाणे विक्रीस उपलब्ध...

**जनसचंलन/बुलडाणा**

येत्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना सोयाबीनचे बियाणे उपलब्ध व्हावे, यासाठी शेतकऱ्यांनी राखून ठेवलेले बियाणे विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आले आहे. प्रत्येक वर्षी नवीन बियाणे खरेदी करूनच पेरणी करणे आवश्यक नाही. परंतु सोयाबीन या पिकांमध्ये स्वपराग सिंचन होत असल्याने कोणतेही संकरित वाण उपलब्ध नाही. त्यामुळे सरळ वाणांचे बियाणे एकदा विकत घेतल्यानंतर त्यापासून तयार होणारे बियाणे आपण पुढे दोन वर्ष बियाणे म्हणून वापरता येते. त्यामुळे अनावश्यकपणे बाजारामधून दरवर्षी बियाणे करण्याची आवश्यकता नाही. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात राखून ठेवलेले बियाणे विक्रीसाठी उपलब्ध आहे. सोयाबीन वाणाचे नाव आणि शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेले बियाणे पुढीलप्रमाणे उपलब्ध आहेत. यात जे. एस ३३५ -१,५०,१०६ क्विंटल, फुले संगम १,३५,४१५, फुले किमया ६४,५५६, एम.ए.यु. एस ६१२ -४,०८२, ए.एस.९३०५ २९,१३५, एम.ए.यू.एस ७१ १०,५१२, एम.ए.यु.एस १६२ ९,२२३, ग्रिनगोल्ड - ८,९२७, रुची १००१ १३,०८३, एम.ए.यु. एस १५८ ४,६३०, के.डी.एम. चंद्रा ३,२८१, फुले द्रुवा २,१०१, अंकुर - १,५३८, रवी १,१४०, पिडीकेव्ही-अंबा - ८८९, फुले द्रुवा के.डी.एम ९९२ १,२२८, जे.एस ९५६० - ७९२, ३३४४ - ७२५, एम.ए.यु.एस ११८८ - ४२८, बुस्टर - ४०५, इतर वाण ३,३१३ असे एकूण ४ लाख ७५ हजार ५०९ क्विंटल बियाणे उपलब्ध आहेत.

# आरसेटीमध्ये पर्यावरण दिन साजरा

**जनसंचलन/बुलडाणा**

सेंट ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेत जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी रोहित गाडे अध्यक्षस्थानी होते, तर आरसेटी संचालक संदीप पोटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री. गाडे यांनी, निसर्ग हा पोषक, प्रेमळ आणि आलिंगन देणारा आहे. हे आपल्याला जगण्यासाठी आणि आपल्या कल्याणासाठी आवश्यक असलेली सर्व संसाधने प्रदान करतो. शारीरिक आणि मानसिक निरोगीपणासाठी, निसर्ग आपल्याला प्रत्येक गोष्टीत सर्वोत्तम



मदत करण्यासाठी परिपूर्ण असल्याचे सांगितले. आरसेटी संचालक श्री. पोटे यांनी, मानवाने नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास केल्यामुळे प्रदूषण आणि ग्लोबल वॉर्मिंगला कारणीभूत ठरले आहे. आता आपण निसर्गाकडे वळावे आणि त्याचे जतन करण्यास सुरवात करावी, असे आवाहन केले. यावेळी आरसेटीच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले.

# वडीलांच्या द्वित्तीय स्मृतीदिनी मुलगी मुलगा यांनी बुध्द विहारास दहा हजाराचे दिले धम्मदान

**जनसंचलन/बुलडाणा**

बुलडाणा येथील से.नि.शिक्षण विस्तार अधिकारी विमल बाबासाहेब जाधव व जालणा येथील मुलगा से.नि.पोलीस इन्सपेक्टर पंडीत पुंडलीकराव इंगळे या बहीण भावांनी विचार केला की, से.नि. डिवायएसपी कालकथीत पुंडलीकराव जयराम इंगळे वडील यांचा व्दितय स्मृतीदिन ५ जून २०२४ आहे ह्या स्मृतीदिन कार्यक्रमावर होणारा खर्च इतरत्र न करता धम्मचक्र बुध्द विहार साळेगाव रामनगर साखर कारखाना जालणा येथे भंते रेवत यांनी स्थापन केलेल्या धम्मचक्र चॅरिटेबल ट्रस्ट साळेगाव या चॅरुटेबल ट्रस्ट व्दारे भव्य असे बुध्द विहार बांधत आहे या बुध्द विहारास आपल्या वडिलांचा व्दितय स्मृतीदिनाचा होणारा खर्च धार्मिक कामासाठी साळेगाव बुध्द विहारास देण्याचे ठरले. बहीण भावांनी जालणा येथील त्यांच्या गंगोत्री निवास स्थानी छोट्याखानी घरगुती कार्यक्रम आयोजित करून पुज्य भंते रेवत,भिक्खु यशोदिप व बालभंते सुंदसेन यांना आमंत्रित करून त्यांच्या हातून भगवान गौतम बुद्ध व बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कालकथीत पुंडलीकराव इंगळे यांचा पुज्य भंते यांनी व्दितय स्मृतीदिनाचा त्रिशरण पंचशील विधीवत पुजाकरून,परित्राणपाठ घेवून पुज्य भंतेना भोजन दान फल दान देण्यात आले व बुध्द विहाराच्या बांधकामास मुलगी विमल बाबासाहेब जाधव व मुलगा पंडीत पुंडलीकराव इंगळे यांनी प्रत्येकी पाच पाच हजार एकून दहा हजार रूपये भंते रेवत यांना बुध्द विहार बांधकामासाठी धम्म दान दिले.या आगोदर मुलगी विमल जाधव यांनी वडिलांच्या प्रथम स्मृतिदिनी



बुलडाणा येथील आशोक काकडे निश्वार्थ चालवत असलेल्या सेवाभावी दिव्य सेवा अनाथालय प्रकल्पास १५ हजाराचे धान्य व किराणा माल दान दिला होता. विमल बाबासाहेब जाधव ह्या प्रत्येक आपले घरातील व्यक्तीचे वाढदिवस व इतर कार्यक्रम यांचे वरील आर्थिक खर्च इतरत्र खर्च न करता होणाऱ्या खर्चाची रक्कम धार्मिक कामासाठी, शाळेत उपयोगी साहित्य, वाचनालयाला पुस्तके देवून कार्यक्रम साजरा करीत असतात.

# पाणीटंचाई निवारणार्थ धानोरी येथे टँकर मंजूर

**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्ह्यातील काही तालुक्यात सद्यस्थितीत पिण्याच्या स्त्रोतापासून आवश्यक पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे धानोरी, ता. चिखली गावाला टँकरने पाणीपुरवठा करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. दरडोई दरदिवशी २० लिटर्स उपलब्ध होण्यासाठी पाणीटंचाई निवारणार्थ उपाययोजना म्हणून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. त्यानुसार धानोरी, ता. चिखली येथे एका टँकरने पाणीपुरवठा करण्यात



येणार आहे. धानोरी गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे सदर गावामधील पाणीटंचाई कमी होण्यास मदत होणार आहे, असे उपविभागीय अधिकारी, बुलडाणा यांनी कळविले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## जिजामाता महाविद्यालयात शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त अभिवादन



**जनसंचलन/बुलडाणा**
श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती व्दारा संचालित स्थानिक जिजामाता महाविद्यालयात छत्रपती शिवाजी राजे भोसले महाराज यांना शिवराज्याभिषेक दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रशांत कोठे यांचे मार्गदर्शनात इतिहास विभागाद्वारे आयोजित करण्यात आला . या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रशांत कोठे व इतिहास विभागाचे प्रा डॉ नामदेव ढाले यांनी ३५० शिवराज्याभिषेक दिनानिमित्त मार्गदर्शन केले. शिवराज्याभिषेकाचे तत्कालीन परिस्थितील महत्व व आवश्यकता यासंबंधी मार्गदर्शन करताना छत्रपती शिवाजी महाराजांचे सार्वभौम, धर्मनिरपेक्ष राज्याची निर्मिती व त्याचा तत्कालीन राजकारणातील प्रभाव यासंबंधी विस्तुत मार्गदर्शन केले.
कार्यक्रमास आयक्युएसी चे प्रमुख प्रा सुबोध चिंचोले, कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख प्रा संजय सोनुने, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा डॉ सुरेश गवई, कला शाखेचे प्रमुख प्रा डॉ जे जे जाधव, डॉ. डी. जे. कांदे, तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतीचा वाद जिवावर बेतला

## सख्ख्या पुतण्याने काकाच्या अंगावर घातला ट्रॅक्टर

**जनसंचलन/ चिखली**
शेतीच्या वाटा हिश्यावरून अनेक वर्षांपासून सुरू असलेला वाद विकोपाला गेला अन् सख्ख्या पुतण्याने काकावर ट्रॅक्टर चालवून त्यांचा खून केल्याची घटना चिखली तालुक्यातील धोत्रा भनगोजी येथे ६ जूनला सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. जनार्धन तुकाराम जोशी असे मृतकाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, तालुक्यातील धोत्रा भनगोजी येथे जनार्धन तुकाराम जोशी व उत्तम तुकाराम जोशी या दोन सख्ख्या भावांमध्ये वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वाटा-हिश्शावरून पूर्वीपासून वाद आहे. या वादाने अमडापूर पोलिस स्टेशनसह दिव-णी न्यायालयाची पायरी यापूर्वीच ओलांडलेली आहे. दरम्यान, ६ जून रोजी शेतकरी जनार्धन जोशी यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या शेतात या प्रकरणातील संशयित व मृतकाचा पुतण्या समाधान उत्तम जोशी हा ट्रॅक्टरने वख-रणी करण्यासाठी आला असता त्यास जनार्धन जोशी यांनी विरोध केला.यावरून बाचाबाची झाल्याने पुतण्याने थेट आपल्या काकावरच ट्रॅक्टर घातल्याने जनार्धन जोशींचा घटनास्थळीच मृत्यू झाला असल्याचे स्थानिकांनी सांगितले. या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता. घटनास्थळी अमडापूर पोलिस स्टेशनचे ठाणेदार सचिन पाटील, पीएसआय इंगळे, एएसआय टेकाळे सहकाऱ्यांसह दाखल झाले होते. पंचनाम्याअंती मृतदेह शवविच्छेदनासाठी चिखली उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात



आला आहे. दरम्यान, वृत्त लिहीपर्यंत या प्रकरणी अमडापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता.गुन्हा दाखल झाल्यानंतर या प्रकरणातील अनेक बाबींचा उलगडा होऊ शकतो.

## सैनिकी वसतिगृहातील उपहारगृहासाठी प्रस्ताव आमंत्रित

**जनसंचलन/बुलडाणा**
चिखली रस्त्यावरील सैनिकी मुलांच्या वसतिगृहातील भोजन कक्ष उपहार गृहासाठी भाडेतत्वावर देण्यात येणार आहे. यासाठी प्रस्ताव आमंत्रित करण्यात आले आहे. चिखली रोडवरील लक्ष्मी माता मंदिराजवळ सैनिकी मुलांचे वसतिगृह आहे. याठिकाणी माजी सैनिकांच्या उपचाराकरीता इसीएचएस कार्यान्वित आहे. इसीएचएसमध्ये दररोज सुमारे १५० माजी सैनिक, माजी सैनिक विधवा तसेच त्यांचे अवलंबित उपचार व योजनेचा लाभ घेण्यासाठी येतात. सैनिकी मुलांच्या वसतिगृहाजवळ १ किलोमीटर अंतराच्या आत अल्पोपहाराकरीता कोणतेही उपहारगृह उपलब्ध नाही. त्यामुळे वसतिगृहातील भोजनकक्ष भाडेतत्वावर देण्यासाठी जिल्ह्यातील इच्छुक माजी सैनिक, माजी सैनिक महिला बचतगट, माजी सैनिक विधवा आणि इतर नागरिकांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. भोजनकक्ष भाडेतत्वावर देण्यासाठी माजी सैनिक महिला बचत गट, माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, इतर नागरीक असा प्राधान्यक्रम रा-हणार आहे. त्यामुळे अर्जदारांनी आपले अर्ज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलडाणा येथे दि. २० जून २०२४ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

## घरफोडीतील गुन्हेगाराला एका तासात अटक

**जनसंचलन/ शेगाव**
शहर पोलिसांच्या सतर्कतेने घरफोडीतील सराईत गुन्हेगाराला एक तासाच्या आत अटक करण्यात आली. याप्रकरणी तक्रारदार रामकृष्ण महादेव जमावे (रा. सुदामा नगर, शेगाव) यांनी शेगाव शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यामध्ये अनोळखी २५ वर्षांच्या चोरट्याने घरात घुसून दोन मोबाइल व ५०० रुपये चोरून नेल्याचे सांगितले. याप्रकरणी पोलिसांनी पेट्रोलिंग करून एका तासाच्या आत एका संशयिताला ताब्यात घेतले. त्याची ओळख पटली. तसेच तो चोरटा खामगाव येथील घरफोडीचा सराईत गुन्हेगार असल्याचे उघड झाले. पोलिसांनी त्याच्याकडून मुद्देमाल जप्त केला.

# जिल्ह्यातील विविध भागात मान्सूनपूर्व पावसाची हजेरी

**जनसंचलन/बुलढाणा**
जिल्ह्यातील अनेक भागात ५ जून रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास मान्सूनपूर्व पावसाने हजेरी ला-वली. यामुळे शेती मशागतीच्या कामांना वेग आला असून खते, बियाणे खरेदीसाठी शेतकरी कृषी दुकानांवर गर्दी करताना दिसून येत आहे. बुधवारी रात्री झालेल्या पावसाने शेतात पाणी साचले होते. तर भाजीपाल्याचे पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांचे या पावसाने प्रचंड नुकसान झाले. मे महिन्यात मिरची पिकाची लागवड केलेल्या शेतकऱ्यांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला आहे. चांगला पाऊस झाल्यानंतरच करा पेरणी शेतकऱ्यांनी खरिपाच्या पे-रणीची तयारी पूर्ण केली असून बियाणे, खते खरेदी केले आहेत. काही शेतकरी मान्सूनपूर्व पाऊस झाल्यानंतर पेरणीसाठी लगबग करतात. जून महिन्यात पेरणी झाल्यास पीक चांगले येते असा शेतकयांचा अनुभव आहे. मात्र, जोपर्यंत पुरेसा पाऊस पडून जमिनीत खोलपर्यंत ओलावा जात नाही तोपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणी करू नये, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना करण्यात आले आहे. पाण्याच्या टँकरसाठी येणारा खर्च आता वाचणार आहे. अनेक शेतकऱ्यांनी शेतीची मशागत पूर्ण केली आहे. मात्र, पाऊस वेळेवर येईल की, नाही यामुळे अनेक शेतकऱ्यांनी खते, बियाणे खरेदी केले नव्हते. जिल्ह्यात सलग दोन दिवसांपासून मान्सूनपूर्व पाऊस पडत असल्यामुळे शेतकऱ्यांनी बियाणे खते खरेदीला सुरुवात केली असन कषी केंद्रांवर गर्दी होताना दिसन येत आहे. दरम्यान, जोपर्यंत मा-न्सूनचा पाऊस पडत नाही आणि जमिनीत खोलपर्यंत ओलावा जात नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणी करू नये, असे आव-ाहन कृषी विभागाच्यानेकेले आहे. दरम्यान बुलढाणा जिल्ह्यात वार्षिक सरासरी ७६१ मि.मी. पाऊस पडत असतो. यंदा सरासरीच्या अधिक



पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. महाराष्ट्रात लवकरच मान्सून-चे आगमन होणार आहे. मात्र, यापूर्वीच मान्सूनपूर्व पावस-ाने हजेरी लावल्याने जिल्ह्यात शेती कामांना वेग आला असून शेतकरी सुखावले आहेत. मे महिन्यात अनेक शेतकऱ्यांनी मिरची पिकाची लागवड केलेली आहे. मात्र, यंदा तापमानात प्रचंड वाढ झाल्याने विहिरींनी तळ गाठला होता. यामुळे मिरची पिकांना जगविण्यासाठी शेतकऱ्यांनी टँकरचे पाणी घेऊन पीक जोपासले. मा-न्सूनपूर्व पावसामुळे मिरची पिकाची लागवड केलेल्या शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला असन.


दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ४२ जागांची जबाबदारी माझी, तुमानेंना तिकीट द्याल तर ४१, बावनकुळेंनी घातलेली शाहांना अट?

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

मी ४२ जागांची जबाबदारी घेतो, मात्र रामटेक लोकसभा मतदारसंघातून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे विद्यमान खासदार कृपाल तुमाने यांना तिकीट दिलंत, तर ४१ ची घेतो, असं भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे केंद्रीय नेते अमित शाह यांना म्हणाले होते, असा दावा कृपाल तुमाने यांनी केला. जागा गमावल्याचं दुःख तुमानेंनी व्यक्त केलं. एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने आम्ही सर्व जण दिल्लीत आलोय. मी दोन टर्म रामटेकचं प्रतिनिधित्व केलं. एक लाखापेक्षा जास्त मताधिक्याने मी दोन्ही वेळा निवडून येत होतो. मात्र भाजप प्रदेशाध्यक्षांनी कोणता सर्व्हे केला माहिती नाही, असं तुमाने एबीपी माझाशी दिल्लीत संवाद साधताना म्हणाले. शिंदेंसोबत राहिलेले रामटेकचे शिवसेना खासदार कृपाल तुमाने यांचा पत्ता कट करत काँग्रेसमधून आलेले आमदार राजू पारवे यांना लोकसभेची उमेदवारी देण्यात आली होती.भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात या निवडणुका झाल्या. प्रदेशाध्यक्ष या नात्याने पराभवाची संपूर्ण जबाबदारी त्यांची आहे. अर्थात हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत मामला आहे, मी त्याबद्दल बोलणार नाही, पण रामटेक मतदारसंघासाठी व्हिलन बावनकुळेच आ-हेत, अशा भावनाही कृपाल तुमाने यांनी व्यक्त केल्या.मी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, बावनकुळे जेव्हा चर्चेसाठी बसलो होतो, तेव्हा ज्या अट्टाहासाने ते बोलत होते, की यांना उमेदवारी द्यायचीच नाही. कारण काय ते त्यांनाच माहिती, मला माहितीच नाही, मला सांगितलंही नाही. मुख्यमंत्र्यांवर ते रोज इकडून तिकडून दबाव आणायचे. कधी मुंबई, कधी दिल्ली, अमित शाहांकडून. मला पक्षाच्या सर्व्हेत ७६ टक्के जणांनी पसंती दिली होती, तर राजू पारवे यांना केवळ एक टक्का. पण कशीबसं त्यांनी माझं तिकीट कापलं, असं तुमाने यांनी सांगितलं.माझ्याऐवजी काँग्रेसच्या ज्या माणसाला तिकीट दिलं, त्याला निवडून तरी आणायचं होतं. त्याची जबाबदारी त्यांनी घेतली होती. मला मिळालेल्या माहितीनुसार, त्यांनी अमित शहांना सांगितलंही होतं, की मी ४२ ची जबाबदारी घेतो, पण तुमानेंना तिकीट दिलंत तर ४१ ची घेतो, अशा शब्दात कृपाल तुमाने यांनी चीड व्यक्त केली.




## संघाच्या तीन ज्येष्ठ नेत्यांशी फडणवीस यांची भेट...

**वृत्तसंस्था/नागपूर**

राज्यातील कमी जागा आल्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून उपमुख्यमंत्रिपदावरून मुक्त करावे, अशी भूमिका घेणारे देवेंद्र फडणवीस यांची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या तीन ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी भेट घेतल्याने राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या आहेत. सुमारे दीड तास चाललेल्या चर्चेनंतर संघाचा संदेश घेऊन त्यांनी गुरुवारी सायंकाळी राजधानी दिल्ली गाठली. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर फडणवीस यांनी मुंबईत भरगच्च पत्रकार परिषदेत सरकारमधून पदमुक्त होण्याची इच्छा व्यक्त केली. याबाबत पक्षश्रेष्ठींना विनंती करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावर संघटनेत प्रतिक्रिया उमटली. फडणवीस यांनी सरकारमध्ये राहावे, असे आवाहन भाजपने केले आहे. देवेंद्र फडणवीस यांचे गुरुवारी दुपारी नागपुरात आगमन झाले असता, विमानतळावर जंगी स्वागत करण्यात आले. ङ्कदेवेंद्र फडणवीस आगे बढो, हम तुम्हारे साथ हैंङ्ख, ङ्कदेवेंद्रजी संघर्ष करो, हम मिलकर संघर्ष करेंगेङ्ख, अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी परिसर दणाणून सोडला. त्यांनी सरकारमधून राजीनामा दिल्यास नागपुरातील



पदाधिकारीही राजीनामे देतील, अशी भावना व्यक्त करण्यात आली. यावे-ळी शहराध्यक्ष बंटी कुकडे, आमदार मोहन मते, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके आदी उपस्थित होते.यानंतर फडणवीस यांनी शिव-ाजीनगरातील एका कार्यक्रमाला हजेरी लावली आणि धरमपेठेतील निवासस्थानी गेले. दरम्यान, संघाचे सहसरकार्यवाह अतुल लिमये व अन्य दोन पदाधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन प्रदीर्घ चर्चा केली. सुमारे दीड तास हा संवाद चालला. मंत्रिमंडळातून बाहेर पडायचे नाही, संघटनात्मक बदल, दिल्लीसाठी सूचक संदेश आदी मुद्यांवर चर्चा झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. संघाचा शिक्षा वर्ग सुरू असल्याने पदाधिकारी ना-गपुरात आहेत. इतर कामांसाठी पदाधिकारी भेटले असावेत, असा दावाही केला जात आहे. आहे. संघाने कोणता संदेश दिला आणि आगामी वाटचाल कशी राहणार आहे, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## पक्षाला आलेले अपयश हे माझ्यामुळे, मी कुठेतरी कमी पडलो-अजित पवार

**वृत्तसंस्था/मुंबई**

लोकसभा निवडणुकीत आम्ही अपेक्षित आकडा गाठू शकलो नाही, हा निकाल कशामुळे लागला याची चर्चा आम्ही दिवसभर केली. बारामतीमध्ये लागलेल्या निकालाने मी आश्चर्यचकित झालो आहे, ज्या मतदारसंघात मी निवडून येतो तिथल्या जनतेने मला का पाठिंबा दिला नाही, हे मला समजत नाही. पण पक्षाला आलेले अपयश हे माझ्यामुळे आले, मी कमी पडलो, अशी स्पष्टोक्ती राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी गुरूवारी दिली. तसेच मुस्लिम आणि मागासवर्गीय मतदारांच्या नाराजीचा जोरदार फटका आम्हाला बसल्याचे पवारांनी मान्य केले.निवडणुकीतील निराशाजनक कामगिरीवर मंथन करण्यासाठी गुरुवारी राष्ट्रवादी पक्षाने बैठका बोलावल्या होत्या. आमदारांच्या बैठकीनंतर संवाद साधताना अजित पवार यांनी लोकसभा निवडणुकीतील पराभवाची जबाबदारी स्वीकारली. राज्यातील ४८ जागांमध्ये महायुती म्हणून आम्ही कुठे कमी पडलो याची चर्चाही करण्यात येणार असून शुक्रवारी एनडीएच्या बैठकीसाठी दिल्लीत असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह बैठक घेऊन चर्चा करण्यात येईल, असेही पवार यांनी स्पष्ट केले. निवडणुकीत आमचा पक्ष अपेक्षित आकडा गाठू शकला नाही, असा निकाल कशामुळे लागले याची चर्चा आम्ही दिवसभर दोन बैठकांतून केली. यातही बारामतीचा निकाल खूपच आश्चर्यकारक आहे, असे अजित पवार यांनी सांगितले. बारामती लोकसभा मतदारसंघातील इतर विधानसभा क्षेत्र जाऊ द्या, ज्या मतदारसंघातून मी निवडून येतो, तिथल्या जनतेने मला पाठिंबा का दिला नाही, हे समजत नाही, असेही पवार यांनी अधोरेखित केले. पण नाऊमेद न होता काम करण्याचे मी सर्व पक्षातील सहकाऱ्यांना सांगितल्याचे पवार म्हणा-ले.पराभवाच्या कारणांबाबत बोलताना पवार यांनी ४०० पारच्या घोषणेमुळे विरोधकांनी संविधान बदलाचा प्रचार केला तो जनतेवर बिंबवण्यात विरोधक यशस्वी ठरले. तर मुस्लिम समाजही आमच्यापासून दूर गेल्याने आमचा जनाधार घटल्याचे पवारांनी मान्य केले. तसेच मराठा आरक्षणाचा जोरद-ार फटका संपूर्ण महायुतीला बसल्याने



मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर सोडले तर सर्व मतदारसंघात मविआची सरशी झाल्याचे निरीक्षण पवारांनी मांडले.दरम्यान, राष्ट्रवादीचे काही आमदार शरद पवार यांच्या संपर्कात असल्याच्या चर्चांचे अजित पवार यांनी खंडन केले. काही आमदार अडचणींमुळे येऊ शकले नाही पण त्यांनी संपर्क साधून कळविले होते. जितके आमदार हजर होते त्यांनी सर्वांनी काहीही झाले तरी पक्षाची साथ सोडणार नाही हे स्पष्ट केले. परंतु, लोकसभा निवडणुकीच्या निकालाचा प्रभाव टाळायचा असेल तर राज्यात काही निर्णय घ्यावे लागतील, असे आमदारांनी सूचविले असून त्याविषयी महायुतीच्या नेत्यांनी लवकरच चर्चा करु, असेही पवार म्हणाले.